महानगरपालिका, नगर परिषदा, नगरपंचायती,
जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व
ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक / पोट
निवडणुकांमध्ये उमेदवाराने केलेल्या खर्चाचा
हिशेब सादर न केल्यास अनर्ह ठरविण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**क्रमांक- रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का-६,**
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई :- ४०० ०३२
दिनांक - १० ऑगस्ट, २०१५.

संदर्भ :- १) क्र.एसईसी-१०९५/१०१/कार्या-३, दि.०७/०२/१९९५ चे आदेश.
२) क्र.एसईसी-१०९५/१०१/कार्या-३, दि.२१/०४/१९९५ चे आदेश.
३) क्र.रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५, दि.३०/०७/२०११ चे आदेश.
४) क्र.रानिआ/नप-२००९/प्र.क्र.१३/का.५ व ६, दि.५/६/२०१० चे आदेश.
५) क्र.रानिआ/जिपपंस-२०१०/प्र.क्र.९/का.७, दि.१९/११/२०१० चे आदेश.

## आदेश

ज्याअर्थी, -

(i) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकाचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

(ii) राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा, खर्च सादर करण्याचा कालावधी आणि पध्दत दि. ७ फेब्रुवारी, १९९५ मध्ये निश्चित केली असून खर्चाच्या मर्यादेमध्ये वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सध्या खर्चाची मर्यादा दि.३०/०७/२०११ च्या आदेशाप्रमाणे वापरण्यात येते.

(iii) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एमईसी-१०९५/१०१/कार्या-३, दि. ७ फेब्रुवारी, १९९५ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाची माहिती निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात सादर करणे बंधनकारक आहे.

(iv) उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि रितीने देण्यात कसूर केली तर महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींकरिता त्याला तीन वर्षाच्या कालावधीकरिता व जिल्हा परिषदा, पंचायत

समित्या व ग्रामपंचायतींकरिता पाच वर्षाकरिता अनर्ह ठरविण्याबाबतची तरतूद केलेली आहे. अनर्ह ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकांकरिता विभागीय आयुक्त आणि नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता जिल्हाधिकारी यांना दि. ५ जून, २०१० व दि. १९ नोव्हेंबर, २०१० च्या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत. (सक्षम अधिकारी)

(v) सक्षम अधिकाऱ्याने उमेदवारास अनर्ह ठरविल्यानंतर महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींकरिता अनर्ह झालेले उमेदवार राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता विभागीय आयुक्त यांच्याकडे अपिल दाखल करु शकतात.

आणि ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोगाच्या खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत, -

(i) निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाबाबतचे विवरणपत्र उमेदवार वेळीच सादर करत नाहीत.

(ii) विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबतचे आदेश अनेक वेळा विलंबाने काढतात.

(iii) नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये अनर्ह ठरविण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचे असून अपिल थेट राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे आहे. (याउलट जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता सक्षम अधिकारी जिल्हाधिकारी असून अपिल विभागीय आयुक्त यांच्याकडे आहे.)

आणि ज्याअर्थी,

वरील कारणांमुळे निवडणूक खर्च विहित कालावधीत व रितीने सादर न करणा-या उमेदवारांना वेळीच अनर्ह ठरविले जात नाही.

त्याअर्थी,

(i) निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाबाबत माहिती संबंधित उमेदवाराने वेळीच सादर करणे, आणि

(ii) विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना वेळीच अनर्ह ठरविणे.

या दोन बाबींकरिता राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४),महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ

करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

## आदेश

(i) निवडणुकांच्या नामनिर्देशनपत्रासोबत संबंधित उमेदवार यांचेकडून सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** नुसार हमीपत्र घेण्यात यावे.

(ii) या आदेशाच्या दिनांकापासून अनर्ह ठरविणे व अपिलावर निर्णय घेण्याचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील:-

(अ) निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून संबंधित उमेदवारांनी ३० दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब विहित रितीने सोबतच्या **परिशिष्ट-२** मधील रकाना क्रमांक (३) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावा.

(ब) खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व रितीने सादर न करणा-या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार रकाना क्रमांक- (४) मध्ये नमूद सक्षम अधिकारी यांना राहतील. त्यांनी अनर्हतेसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे कमाल ३ महिन्यांत घ्यावा.

(क) सक्षम अधिकारी यांनी अनर्ह ठरविल्याच्या आदेशाविरुध्द संबंधित उमेदवारास अनर्ह ठरविल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रकाना क्रमांक-(५) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल.

(ड) अपिलीय अधिकारी यांनी सर्वसाधारणपणे १ महिन्यात अपिलावर निर्णय घ्यावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

(ध.मा.कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, नगरपालिका प्रशासन, संचालनालय, वरळी, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे संबंधित तहसिलदार तथा प्रशासक / मुख्याधिकारी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
८. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
९. निवड नस्ती

# परिशिष्ट-१

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का-६, दि. १०/०८/२०१५ सोबतचे)

# हमीपत्र

मी * श्री/श्रीमती ........................................................................ (स्वत:चे नाव) श्री ............................ *वडिलांचे/पतीचे नाव यांचा /यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ...... वर्षे, राहणार ................................. (पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो/करते की,

१. मी.............................................................* महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत निवडणुकीसाठी * प्रभाग / निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक.......मधून या................(जागेचे नाव असल्यास) जागेकरिता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

२. मी दररोजच्या निवडणूक खर्चाचा हिशोब दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावयाची हमी घेतो / घेते.

३. मी निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत विहित शपथपत्रासह निवडणूक खर्चाचा सविस्तर हिशोब सादर करून त्याची पोचपावती घेण्याची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

४. निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत निवडणूक खर्चाचा हिशोब विहिती पध्दतीने सादर करण्यास कसूर केल्यास मी महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह / अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

(उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा)

स्थळ :

दिनांक :

* आवश्यक नसलेला मजकूर खोडावा.

# परिशिष्ट-२

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का-६, दि. १०/०८/२०१५)

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | खर्चाचा हिशोब कोणास सादर करावयाचा आहे. (प्राधिकृत अधिकारी) | खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व रितीने सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्यास सक्षम अधिकारी | अनर्ह ठरविल्याच्या आदेशाविरुध्द अपिल कोणाकडे दाखल करता येईल?. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला महानगरपालिका उपायुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | विभागीय आयुक्त | आयुक्त, राज्य निवडणूक आयोग |
| २ | नगर परिषद, नगर पंचायती | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (जिल्हयाकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ३ | जिल्हा परिषद, पंचायत समिती | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (जिल्हयाकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ४ | ग्रामपंचायत | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (आवश्यकतेप्रमाणे प्रत्येक तहसीलकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |